
# मनोगत Acknowledgement

पुरातन कालापासून भारत देश ज्ञान, अध्यात्म आणि विविध कलांसाठी साऱ्या जगतात प्रसिद्ध आहे. संगीत-नाट्य-चित्र-शिल्प आदी कलांच्या भारतात भरपूर उत्कर्ष झालेला दिसून येतो. संगीत कलेत तर भारताचे नांव प्रामुख्याने घेतले जाते. संगीताचे सामर्थ्य अलौकिक आहे. आजारी माणसांवर (रोगांवर), वनस्पतींवर, पशु-पक्ष्यांवर पडलेला संगीताचा प्रभाव आपल्याला अमान्य करता येणार नाही. भारतीय संगीत हे एक श्रेष्ठ संगीत आहे, हे आपल्याला थोर थोर कलाकारांमुळे जाणवते. तसेच पाश्चात्य देशांत सुद्धा भारतीय संगीताला फार मानाचे स्थान आहे.




भारतीय संगीताला एक परंपरा आहे. अगदी वेदकाल, पुराणकाल ते आत्तापर्यंत हे संगीत गुरु-शिष्य परंपरेने चालत आलेले आहे. आणि हे पाहिल्यानंतर या गुरु-शिष्य परंपरेच्या - घराण्यांचा आपण अभ्यास करावा असं मी ठरवलं. या माझ्या अभ्यासात माझे गुरु व मार्गदर्शक प्रो. वसंत रानडे यांनी मला जे बहुमोल मार्गदर्शन केले त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी आहे. प्रस्तुत प्रबंध लिहिण्यात वेळोवेळी त्यांनी मला जे उचित मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभार मानावयास माझ्याजवळ शब्दच नाहीत.

तसेच माझे गुरू - पं. नारायणराव पटवर्धन यांनी सुद्धा आपला अमूल्य वेळ देऊन मला जे मार्गदर्शन केले व बरीचशी पुस्तकं उपलब्ध करून दिली, त्याबद्दल त्यांचे आभार कोणत्या शब्दात मानू तेच कळत नाही. प्रो. वसंत रानडे व पं. नारायणराव पटवर्धन या दोघांनी मला वेळोवेळी ज्या सूचना दिल्या आणि सर्वतोपरी सहाय्य केले त्याबद्दल त्या दोघांचेही आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

सौ. सरस्वती नारायणराव पटवर्धन आणि सौ. वसुधा वसंत रानडे या दोघींनीही मला घरच्यासारखे वागवून, प्रेमाने जी मदत केली त्याबद्दल मी, त्या दोघींच्याही ऋणात राहणेच पसंत करीन.

साहित्य व लेखनाच्या बाबतीत प्रा. सुशीलाताई मुन्शी यांनी आपला वेळ काढून मला जे बहुमोल सहाय्य केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. कामाच्या निमित्ताने त्यांच्याकडे गेले असताना त्या व त्यांचे कुटुंबीय यांनी मला जी आत्मीयतेची वागणूक दिली त्याबद्दल त्यांचेही आभार मानावयास हवेत.

त्याचप्रमाणे माझे चुलते डॉ. बाळ पुरोहित यांचेही मला जे सहाय्य झाले त्याबद्दल मी त्यांचीही आभारी आहे.



तसेच श्रीमती कमलताई वांबे, श्रीमती धोंडूताई कुलकर्णी, श्रीमती लिलाताई शिरगांवकर, श्रीमती कुंदाताई शिरगांवकर, श्री. रमेश नाडकर्णी, श्री. मदनलाल व्यास, प्रा. व्ही. आर. आठवले, श्री. वसंत कर्नाड, पं. रतन पई, श्री. प्रभाकर सबनीस. इत्यादी विद्वानांशी प्रत्यक्ष चर्चा करायला मिळाल्यामुळे प्रस्तुत शोधप्रबंधात भरच पडली. या सर्वांचीच मी फार आभारी आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी मी, फॅकल्टी ऑफ परफॉर्मिंग आर्टस् म. स. विश्वविद्यालय बडोदे, दिल्ली विश्वविद्यालय दिल्ली, कुरूक्षेत्र विश्वविद्यालय कुरूक्षेत्र, इंदिरा कला संगीत विश्वविद्यालय खेरागड, एन. सी. पी. ए. मुंबई, एस. एन. डी. टी. विश्वविद्यालय मुंबई इत्यादी ग्रंथालयांचे सहाय्य घेतले.

या शोधप्रबंधाच्या सजावटीसाठी श्री. देविदास तुपकरी यांचे मला जे सहाय्य झाले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

तसेच श्री. अभय वसंत अयाचित, श्री. व सौ. सुरेश श्रीखंडे व माझा मित्र परिवार, यांची मला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रित्या जी मदत झाली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

मी माझ्या आई-वडिलांच्या प्रोत्साहनानेच संगीत कलेच्या अभ्यासाकडे वळली व हा प्रबंध पूर्ण करू शकली. माझी ही आवड पूर्ण करण्यासाठी माझी आई - सौ. मंगला चंद्रकांत बाकरे आणि वडिल - श्री. चंद्रकांत अच्युतराव बाकरे यांनी जे कष्ट घेतले त्याबद्दल मी त्यांचे ऋण मान्य करून त्यांच्या व माझ्या गुरूंच्या आशिर्वादाची अपेक्षा ठेवून थांबते.

कु. सुषमा चंद्रकांत बाकरे
२८/५/९०.

